

# कृषि विभाग

## जिल्हा परिषद पालघर



## बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना

बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना अंतर्गत अनुसूचित जमाती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांना नवीन सिंचन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळयाचे प्लॅस्टिक अस्तरीकरण ई. घटकांसाठी पॅकेज स्वरुपात खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते. महाडीबीटी पोर्टलवर शेतकरी अर्जापासुन ते निधी वितरणापर्यंतची संपुर्ण कार्यवाही ऑनलाइन पध्दतीने केली जाते.

| घटक | उच्चतम देय अनुदान |
|---|---|
| ✦ नवीन सिंचन विहीर | ४,००,०००/- |
| ✦ जुनी विहीर दुरुस्ती | १,००,०००/- |
| ✦ शेततळयाचे अस्तरीकरण | २,००,०००/- |
| ✦ इनवेल बोअरींग | ४०,०००/- |
| ✦ विंधन विहीर | ५०,०००/- |
| ✦ पाईप (PVC) | ५०,०००/- |

| घटक | उच्चतम देय अनुदान |
|---|---|
| ✦ पंपसंच | ४०,०००/- |
| ✦ सोलार पंप | ५०,०००/- |
| ✦ ठिबक सिंचन संच | ९७,०००/- |
| ✦ तुषार सिंचन संच | ४७०००/- |
| ✦ परस बाग | ५,०००/- |
| ✦ यंत्रसामुग्री | ५०,०००/- |

### योजनेस पात्र लाभार्थी :-

- लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा शेतकरी असला पाहीजे.
- स्वत:च्या नावाने किमान ०.४० हे ते कमाल ६.०० हे शेतजमीन असणे आवश्यक.
- शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे. शेतकऱ्यांचे नावे जमिन धारणेचा 7/12 दाखला व 8-अ चा उतारा असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.
- लाभार्थ्यांचे बँक खाते असावे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.
- एकदा संबंधित योजनेचा पुर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटूंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही.
- सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांस नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती किंवा शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण यापैकी एकाच घटकाचा लाभ देय राहील.

### आवश्यक कागदपत्रे:-

- आधारकार्ड
- ७/१२ व ८ उतारा (डिजिटल किंवा तलाठी यांचे स्वाक्षरी असलेला)
- वैध जात प्रमाणपत्र
- राष्ट्रीयकृत बँकेचे पासबूक (आधारकार्ड संलग्न)
- ग्रामसभा ठराव

### अर्ज कसा करावा :-

- WWW.MAHADBTMAHAIT.GOV.IN या वेबसाईट वर ऑनलाईन अर्ज करावा लागेल. अर्ज नजीकच्या सीएससी सेंटर मधुन किंवा आधार सेवा केंद्रातून करता येईल.
- अर्ज सद्यास्थितीच्या माहिती साठी MahaDBT Farmer App चा वापर करावा.

**अधिक माहिती साठी नजीकच्या पंचायत समिती किंवा कृषि विभाग, जिल्हा परिषद येथे संपर्क साधावा.**

# कृषि विभाग

## जिल्हा परिषद पालघर

### कृषि विभाग योजनांची माहिति

|| शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी ||

# जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती

## जिल्हा परिषद, सेस फंड योजना

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनगेंतर्गत खरेदी करावयाची साहित्य |
|---|---|---|
| 1 | किडरोगांचे नियंत्रण | किडरोग नियंत्रणासाठी रासायनिक व जेविक किटकनाशके / बुरशीनाशकांची व तणनाशके, नॅपसॅक स्प्रेपंप, बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, फुट स्प्रेअर, रॉकींग/गटोर स्प्रेअर, HTP ट्रीपल पिस्टन स्प्रेअर, पॉवर स्प्रेअर पंप खरेदीकरीता जिल्हा खरेदी समितीने ठरवुन दिलेल्या दरानुसार ५०% अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| 2 | शेतकऱ्यांना पीक संरक्षण अवजारे, साहित्य व इतर बाबी पुरवठा करणे | सौर ऊर्जा चलित प्राणी प्रतिबंधक जैवध्वनी संयंत्र बसवणे व तार कंपाऊन्ड करणे |
| 3 | शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्य व सुधारित कृषि प्रक्रीया उदयोगांकरीता साहित्य पुरवठा | मळणीयंत्र, ताडपत्री, गवतकापणी यंत्र, पॉवर विडर, पॉवर टिलर,चापकटर, काजु प्रक्रिया यंत्र, दातेरी विळे, नारळ झावळ्या कापणी यंत्र, भात लावणी यंत्र, भात कापणी यंत्र, HDPE/PVC पाईप, शेड नेट, मल्चिंग पेपर तसेच इतर मान्यताप्राप्त शेती उपयोगी सुधारित अवजारे व यंत्र सामुग्री यांचेसाठी ५०% अनुदान देणेत येईल. |
| 4 | शेतकऱ्यांना शेतीसाठी सिंचन साहित्य पुरवठा | डिझेल/पेट्रोडिझेल, विद्युत पंपसंच इ. जल उपसा सिंचन साधनांवर ५०% व कृषि सौर पंपासाठी ७५% अनुदान देण्यात येईल, HDPE/PVC पाईप खरेदी करीता ५०% अनुदान देय राहील. |
| 5 | बायोगॅस बांधणी पूरक अनुदान | जिल्हा परिषद योजनेअंतर्गत पूरक अनुदान र. रु. १२०००/- प्रति संयंत्र धारकास देय राहील. |
| 6 | शेतकऱ्यांना बियाणे पुरवठा करणे. | खरिप, रब्बी व उन्हाळी हंगामात भाजीपाला मिनीकीट खरेदीकरीता ७५% अनुदान दिले जाईल. व निरनिराळया पिकांचे सुधारीत व संकरीत बियाणे शेतकऱ्यांना ५०% अनुदानाने उपलब्ध करुन देणे. |
| 7 | फुलशेती व रेशीम उदयोग साठी अर्थसहाय्य | मोगरा, सोनचाफा लागवडीस ७५% अनुदान देय राहील. व रेशीम उदयोगाकरीता तुती लागवड व साहित्य पुरवठा करणेकरीता ५०% अनुदान देय राहील. |
| 8 | आधुनिक शेतीस प्रोत्साहन देणे व नाविण्यपूर्ण योजना राबविणे | १) आधुनिक लोखंडी शिडीसाठी व रोपे खरेदी करीता अनुदान देणे.<br>२) मधुमक्षीका पालनास प्रोत्साहन देणे.<br>३) शेतकरी / शेतकरी / बचतगट / शेतकरी उत्पादक गट यांना भाजीपालाविक्रीकरीता साहित्य पुरविणे.<br>४) आधुनिक पध्दतीने भात पिकाची रोपे तयार करणेस अनुदान देणे. (भात/नर्सरी व लागवड)<br>५) वेलवर्गीय भाजीपाला लागवड साठी मांडव तयार करण्याकरीता अर्थसहाय्य<br>६) मशरुम लागवडसाठी अर्थसहाय्य<br>७) मसालावर्गीय पिके लागवडीसाठी सहाय्यक अनुदान देणे. (काळी मिरी)<br>८) Precision farming (अचूक शेती) ला प्रोत्साहन देणेसाठी IOTआणि सोलार पॅनल आधारित सेन्सरच्या सहाय्याने कृषि उत्पादकता वाढविणेसाठी ९०% अनुदान देणे.<br>९) पानवेल / नागवेल लागवडीकरीता फाटे (Stem Cutting / Sticks) खरेदी करीता अनुदान |
| 9 | शेतकऱ्यांना सिंचनासाठी नविन विहीर खोदकाम व बांधकाम करणे. (सर्वसाधारण) | लाभार्थ्यास नवीन विहीर रक्कम रु. ३, ००,०००/- जुनी विहीर दुरुस्ती रक्कम रु. ७५,०००/- अनुदान देणे. शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी ६५ टक्के अथवा जास्तीत जास्त १०००००/- या मर्यादेत अनुदान देय |
| 10 | कृषि क्षेत्रामध्ये यांत्रिकरण करीता प्रोत्साहन देणे | पॉवर विडर, पॉवर टिलर , मिनी ट्रक्टर, भात लावणी यंत्र ५०% अनुदान देणेत येईल. |
| 11 | कृषी प्रक्रिया सयंत्र खरेदी करीता अर्थ सहाय्य (सोलार ड्रायर) | सोलर ड्रायरकरिता ८०% किंवा रु.२६८८०/- अनुदान देय राहील. |
| 12 | सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे. | गांडूळ खत प्रकल्प उभारण्यासाठी ७५% अनुदान देणे.<br>सेंद्रिय कृषि निविष्ठा यांना ८०% अनुदान देणेत येईल |
| 13 | शेतीत बांबू लागवड करणे | शेतकऱ्यांस कमीत कमी १० आर क्षेत्राच्या मर्यादेत खर्चाच्या ९०% पर्यंत अनुदान देय राहील. |

**सदर योजनेसाठी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :**

१) शेतकऱ्याचा ७/१२ व ८ अ, २) बँक पासबुक झेरॉक्स, ३) ग्रामसभेचा ठराव / शिफारस पत्र, ४) साहित्य खरेदी GST बील

**अधिक माहितीसाठी - कृषि अधिकारी पंचायत समिती यांना संपर्क साधावा.**